# मेट्रो ३ मार्गिकेच्या जवळ होणार वृक्षारोपण

मुंबई, ता. १६ : मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लि. या भारत सरकार आणि राज्य सरकारच्या संयुक्त उपक्रमामार्फत मुंबई महापालिका क्षेत्रातील मेट्रो ३ मार्गिकेच्या आसपासच्या क्षेत्रात वृक्षारोपण करण्यात येणार आहे. नागरिकांच्या सहभागातून स्थानकाच्या बाहेर आणि आसपासच्या परिसरात वृक्षारोपण करावे, असा मुंबई मेट्रो रेलचा उद्देश आहे.

उच्च न्यायालयाने मेट्रो मार्गिकेनजीक वृक्षारोपण करण्याचे निर्देश संबंधित प्राधिकरणाला दिले होते. त्यानुसार मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनतर्फे उच्च न्यायालयापुढे सादर केलेल्या प्रतिज्ञापत्राचे पालन करण्यासाठी हे वृक्षारोपण करण्यात येत आहे. वृक्षांचा पुरवठा, लागवड आणि पुढील सलग तीन वर्षे त्यांची देखभाल ही मुंबई मेट्रो रेलच्या ठेकेदाराची जबाबदारी असेल. यासाठी मुंबई मेट्रोने पूर्ण भोगवटा प्रमाणपत्र असलेले विविध सरकारी/खासगी कार्यालये, निवासी संकुले, शैक्षणिक संस्था, रुग्णालये इत्यादी आस्थापनांना या वृक्षारोपण उपक्रमात सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले आहे. इच्छुक अर्जदार/एजन्सीजने नोडल ऑफिसरशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.